# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कर्मचारी कर्तव्यावर असताना क्रिकेट खेळत असल्याबाबत

**(१) २५८ (१७-०४-२०२५) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे मनुष्यबळ कमी असल्याने कामाचा ताण अधिक असल्याचे सांगितले जात असून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यालयात कर्मचारी कर्तव्यावर असताना अधिकाऱ्यांच्या अनुपस्थित क्रिकेट खेळत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्तव्यावर असताना कामामध्ये दाखविलेल्या हलगर्जीपणास जबाबदार असणाऱ्याची शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०२-२०२६) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) तथापि, संबंधित अधिकारी/कर्मचारी ह्यांना ज्ञापन देऊन २४ तासांच्या आत सदरबाबतचा लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्याअनुषंगाने, संबंधित अधिकारी/कर्मचारी ह्यांनी लेखी खुलासे सादर केले होते. त्यानुसार, संबंधितांना ताकीद देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वानाडोंगरी (ता.हिंगणा,जि.नागपूर) येथील महानगरपालिका हद्दीतील जागेवर अनियमितपणे कचरा डम्प केला जात असल्याबाबत

**(२) २१०७ (१७-०४-२०२५) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वानाडोंगरी (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील महानगरपालिका हद्दीतील जागेवर अनियमितपणे कचरा डम्प केला जात असून या डम्पिंग यार्ड शेजारी आदिवासी मुले व मुलींच्या प्रस्तावित वसतिगृहाचे काम सुरू असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृह सुरू होण्यापूर्वी हे डम्पिंग काढण्यात यावी अशी मागणी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास यांनी दिनांक ३ एप्रिल,२०२४ रोजी वा त्यासुमारास महानगरपालिकेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर महानगरपालिकेने तेथील डम्पिंग यार्ड अद्यापही हटविलेले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन सदरील डम्पिंग यार्ड येथून हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०२-२०२६) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प स्थलांतरीत करण्याकरीता वानाडोंगरी नगरपरिषदेमार्फत निश्चित करण्यात आलेली प्रस्तावित पर्यायी जागा वन विभागाच्या अंतर्गत असल्याने जागा मागणीकरीता प्रस्ताव विहीत नमुन्यात दिनांक १९/०५/२०२५ रोजी नगरपरिषदेकडून वन विभागाकडे सादर करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महानगरपालिका क्षेत्रातील मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये डोक्यावरून मैला वाहून नेणारे कामगार (मेहतर) यांचे सर्व्हेक्षण करण्याबाबत

**(३) २१९६ (१७-०४-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये डोक्यावरून मैला वाहून नेणारे कामगार (मेहतर) यांचे सन २०१३ मध्ये सर्व्हेक्षण करण्यात आले असून केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता विभागाचे सचिव यांनी सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांचे दिनांक ६ ऑक्टोबर, २०२४ रोजी पर्यंतचे सर्व्हेक्षण करण्याचे निदेश दिले असून याबाबत नुकतीच रीट याचिका दाखल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या सर्व्हेक्षणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत एका त्रयस्थ संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांचे सर्व्हेक्षण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०१-२०२६) :** (१) हे अशंतः खरे आहे

केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय विभागाचे सचिव यांनी दिनांक १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत सर्व्हेक्षण करून अहवाल सादर करणेबाबत सूचित केलेले आहे.
(२) हे खरे नाही.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात हाताने मैला उचालणे ही प्रथा पूर्णतः बंद आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मलजल वाहिन्या, सेप्टीक टँक, या यांत्रिक उपकरणांद्वारे साफ करण्यात येत आहेत.

घन कचरा व्यवस्थापन विभागामार्फत २४ विभागात सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक (घकव्य) यांच्या कडे दिंनाक ०६/१०/२०२४ ते २५/१०/२०२४ या कालावधीत सर्व्हेक्षण नोंदणी ठेवण्यात आली. यासाठी जाहीर अवाहन, वृत्तपत्रे, सामुदायिक सार्वजनिक शौचालय, सफाई चौक्या, यावर प्रसिध्दी देऊन कनिष्ठ पर्यवेक्षक, सफाई कर्मचारी, यांचा झोपडपट्टी वस्तीमध्ये दररोज संपर्क येत असल्याने त्यांच्या माध्यमातून सर्व्हेक्षण नोंदणीबाबत जनजागृती करण्यात आली व मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स म्हणून सफाई काम करित असल्यास नोंदणी करण्याबाबत प्रसिद्धी देण्यात आली. २४ विभागातील सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक (AHS) यांच्या आलेल्या अहवाला नुसार मॅन्युअल स्कॅव्हेंजर्सचा वापर करण्यात येत नाही.

मॅन्युअल स्कॅव्हेंजिंग प्रथा पूर्णतः बंद करण्यासाठी विभाग स्तरावर जनजागृती करण्यात येत आहे.

---

## राज्यातील बोगस कंपन्यांवर कारवाई करणेबाबत

**(४) ३३०० (१५-०७-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या पाच वर्षात किमान २.३३ लाख बोगस कंपन्या बंद केल्या असल्याची माहिती केंद्र शासनाच्या रजिस्टार ऑफ कंपनीच्या (आरओसी) माहितीनुसार समोर आल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या कंपन्यांनी कोणताही व्यवसाय केला नाही किंवा गेल्या दोन आर्थिक वर्षामध्ये आर्थिक विवरणे आणि वार्षिक रिटर्न भरले नाहीत अशा कंपन्यावर संबंधित यंत्रणेकडून वारंवार धडक कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील पाच वर्षात राज्य बोगस कंपन्यामध्ये आघाडीवर असून शासनाने बनावट कंपन्यांवर कोणतीही कायदेशीर कारवाई न करता केवळ त्यांना निष्क्रिय म्हणून वर्गीकृत केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अश्या बोगस कंपन्यामुळे शासनाचे नुकसान होत असल्यामुळे सदर बोगस कंपन्यावर धडक कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१२-०३-२०२६) :** (१) लागू नाही.

(२) ते (४) राज्य शासनाचा वस्तू व सेवाकर विभाग, सर्वसाधारणत: इतर स्त्रोतांकडून प्राप्त माहितीचे तंत्रज्ञानाधारित विश्लेषण करून सातत्याने संशयित व्यापाऱ्यांची प्रकरणे भेटीसाठी निवडत असतो. अशा संशयित व्यापाऱ्यांच्या भेटीद्वारे बोगस व्यापारी शोधून त्यांचे नोंदणी दाखले रद्द केले जातात. तसेच अशा बोगस व्यापाऱ्यांनी बुडवलेला महसूल बोगस व्यापाऱ्यांशी खरेदी व्यवहार करणाऱ्या लाभार्थी व्यापाऱ्यांकडून वसूल केला जातो.

वस्तू व सेवाकर कायद्यातील विवरणपत्रे ६ महिने भरलेली नाहीत अथवा नोंदणीनंतर ६ महिने कुठलाही व्यवसाय केला नसेल तर नोंदणी रद्द करणेची तरतूद आहे. त्यानुसार अशा प्रकरणात GST नोंदणी रद्द करून पुढील सुयोग्य कार्यवाही करण्यात येते. राज्य वस्तू व सेवाकर विभागाने मागील ५ वर्षात बोगस प्रकरणे पडताळणी, बोगस जीएसटी क्रेडिट वसुली, दंडात्मक कारवाई, अटक व मा.न्यायालयात अभियोग दाखल करणे अशी कारवाई केलेली असून ती सातत्याने करण्यात येत आहे. अशा प्रकारची कार्यवाही फक्त ROC अंतर्गत नोंदणी केलेले व्यापारीच नाहीत तर भागीदारी संस्था मालकी व्यवसाय, सहकारी संस्था, सरकारी आस्थापना व इतर प्रकारच्या व्यापाऱ्यांचा समावेश असतो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दक्षिण मुंबईतील पहिल्या रोबोटिक वाहनतळाबाबत

**(५) ३३७५ (१७-०७-२०२५) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण मुंबईतील भुलाभाई देसाई मार्ग येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यातील नुतनीकरण करून पहिले स्वयंचलित वाहनतळ लोकांसाठी खुले करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वाहनतळाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी दरमहा सुमारे १५ लाख रुपयांचा खर्च असून प्रथम सहा महिने आणि त्यानंतर जानेवारी ते मार्च या ९ महिन्यांच्या देखभालीच्या कामांसाठी तब्बल १ कोटी ३६ लाख ५७ हजार रुपये मंजूर करण्यात आले असून हा कालावधी ३१ मार्च, २०२५ पर्यंत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कंत्राटदाराचा कालावधी संपुष्टात आला असून सदरचे देखभाल व दुरुस्तीचे कंत्राट हे त्याच कंत्राटदारास देण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, नव्याने करण्यात येणाऱ्या निविदेची/ कंत्राटाची प्रक्रिया कशाप्रकारे करण्यात आली आहे, त्याचा तपशिल काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
डी विभागातील भुलाभाई देसाई मार्ग येथे पब्लिक प्रायवेट पार्टनरशिप या तत्वावर स्वयंचलित वाहनतळाची उभारणी करण्यात आली आहे.
(२) 'डी' विभागातील भुलाभाई देसाई मार्ग येथील बहुमजली पूर्णपणे स्वयंचलित रोबोटिक वाहनतळाची दुरुस्ती, प्रचलन व परिरक्षणाचे कंत्राट करणेबाबतचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. सदर कंत्राटाचा कालावधी व खर्च खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कंत्राट कालावधी | दिनांक ०१/०५/२०२४ ते दिनांक ३१/१०/२०२४<br>दिनांक ०१/०१/२०२५ ते दिनांक ३१/०३/२०२५ पर्यंत एकूण ०९ महिने |
| कंत्राट खर्च | रुपये १,३६,५७.३३५.९३ |
| दरमहा खर्च | रुपये १५,१७,४८१.७७ |

(३) व (४) सदर कंत्राट हा दिनांक ३१/०३/२०२५ रोजी संपुष्टात आले आहे. डी विभाग कार्यालयातर्फे यांत्रिकी व विद्युत यांचे देखभाल व परिरक्षण तसेच सशुल्क वाहनतळ प्रायोगिक तत्वावर चालविण्याकरीता स्वारस्य अभिरुची मागविण्याचे प्रस्ताविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंकलेश्वर-बऱ्हाणपूर (जि.नंदुरबार) महामार्गावरील डांबरखेडा पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(६) ४०९७ (१८-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंकलेश्वर-बऱ्हाणपूर (जि.नंदुरबार) महामार्गावरील डांबरखेडा पुलाचे काम संथ गतीने सुरु असून पुलाचे काम गत ४ वर्षापासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डांबरखेडा पुलाचे काम गत ४ वर्षापासून अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, डांबरखेडा पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी तसेच पुलाच्या कामास विलंब करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
सदर राष्ट्रीय महामार्ग केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून स्टेट एजन्सी म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत काम करण्यात येत आहे.
(२) पुलाच्या पोहोच मार्गाकरीता आवश्यक भुसंपादनास झालेला विलंब, कोविड-१९ प्रादुर्भाव, तापी व गोमाई नदीच्या संगमावर असलेल्या प्रकाश बॅरेजच्या Stagnant backwater मुळे नदीपात्रातील काम करण्यास कमी कालावधी उपलब्ध असणे, वृक्षतोड परवानगीस विलंब, पोहोच मार्गातील प्रकाशा गावाकरीता असलेल्या पाणीपुरवठा योजना स्थलांतरणास विलंब, इत्यादी कारणांमुळे सदर पुलाचे काम पूर्ण करण्यास विलंब झालेला आहे.
(३) माहे मे-२०२५ मध्ये प्रकाशा शिवारातील भूधारकांचा मोबदला अदा झालेला आहे. सद्य:स्थितीत सदर महामार्गाचा एकूण ४८.६० कि.मी.लांबीच्या काँक्रीटीकरणाचे ९७ टक्के काम पूर्ण झालेले आहे. कंत्राटदारास अतिरीक्त मनुष्यबळ व यंत्रसामुग्री तैनात करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.सदर उर्वरीत काम जलदगतीने पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील चारकोप कांदिवली- पश्चिम येथील भूखंड म्हाडाने ताब्यात घेऊन शासकीय दराने वितरीत करण्याबाबत

**(७) ४१६१ (१८-०७-२०२५) श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील चारकोप कांदिवली- पश्चिम येथील सेक्टर नं.७ मधील आरएससी ४१ प्लॉट नं.३५३ व ३५४ हे भूखंड गेल्या २५ वर्षापेक्षा जास्त काळापासून रिकामे असून सदरहू प्लॉटधारक भूखंड विकसित करीत नसल्याने हे भूखंड म्हाडाने ताब्यात घेऊन सदरहू भूखंड शासकीय दराने मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ मार्च, २०२४ व एप्रिल,२०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भूखंडाच्या आजूबाजूला सदनिका गेल्या ३०-४० वर्षापासून असतानाही सदरहू भूखंड सीआरझेड अंतर्गत असल्याचे दिशाभूल करणारे विधान म्हाडाने केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरील भूखंडाचा गैरवापर होऊ नये याकरीता हा भूखंड ताब्यात घेऊन मागणीप्रमाणे भूखंड शासकीय दराने देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०१-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
सोडतीतील विजेत्या व्यक्ती व्यतीरीक्त भूखंड कोणत्याही व्यक्तीस अथवा संस्थेस थेट पध्दतीने वितरीत करण्याचे म्हाडाचे कोणतेही धोरण नाही.
(४) जागतिक बँक प्रकल्पातंर्गत भूखंडाच्या वितरणासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु सेक्टर-७ येथील काही भाग सी.आर.झेड. ने बाधित असल्याने सोडतीतील विजेते अर्जदारांना भूखंडाचे वितरण स्थगित करण्यात आले होते. परंतु एन.सी.एस.एम. या संस्थेने दिनांक २४/०४/२०२४ रोजी सी.आर.झेड.चे सिमांकन करुन नकाशे सादर केलेले असून सुधारीत अधिसुचनेनुसार काही भूखंड सी.आर.झेड. विरहित झालेले असल्याने भूखंडधारक भूखंडाचा प्रत्यक्ष ताबा मिळणेबाबत कार्यालयास अर्ज करीत आहेत. त्यानुषंगाने सोडतीतील विजेत्यांना भूखंड वितरणाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

## राज्य ग्राहक तक्रार निवारण खंडपीठ, कोल्हापूर येथील कामकाज अनियमितपणे होत असल्याबाबत

**(८) ४२५१ (१७-०७-२०२५) श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य ग्राहक तक्रार निवारण खंडपीठ, कसबा बावडा, (जि.कोल्हापूर) येथील कामकाज नियमितरीत्या चालत नसल्यामुळे अनेक ग्राहकांना तक्रारी नोंदविण्यासाठी किंवा निवारणासाठी त्रास सहन करावा लागत असल्याबाबत अनेक तक्रारी असूनही अध्यक्ष आणि सदस्य तीन ते चार महिने सलग उपस्थित नसल्याने तेथील कामकाज चालत नसल्याचे बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य ग्राहक तक्रार निवारण खंडपीठ, कसबा बावडा (जि.कोल्हापूर) या ठिकाणी महिन्यातून एक आठवडा तरी 'सर्किट बेंच' चालवणे अनिवार्य असतानाही ते नियमितपणे चालत नाही,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य ग्राहक तक्रार निवारण न्यायालयाचे खंडपीठ नियमित चालत नसेल तर हा सर्किट बेंच स्थापन करण्याचा उद्देश सफल होताना दिसत नसून तक्रारदारांना न्याय मिळवून राज्य ग्राहक तक्रार निवारण खंडपीठाचे कामकाज व्यवस्थित सुरु रहावे याकरीता सर्किट बेंच' चे कामकाज नियमितपणे सुरु ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (११-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
अध्यक्ष व सदस्य, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांनी माहे मार्च, २०२५ ते माहे जुन, २०२५ पर्यंत आभासी सुनावणीद्वारे तसेच प्रत्यक्ष उपस्थित राहून पार पाडले आहे.
(३) अध्यक्ष व सदस्य राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांचेमार्फत ग्राहकांच्या सोईसाठी परिक्रमा खंडपीठाचे कामकाज दरमहा जास्तीत जास्त आभासी सुनावणीव्दारे व प्रत्यक्ष उपस्थित राहून केले जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जोगेश्वरी (प) येथील ओशिवरास्थित शाळेच्या क्रीडागंणावर अनधिकृत मदरसा बांधला असल्याबाबत

**(९) ४३४१ (१८-०७-२०२५) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जोगेश्वरी (प) येथील ओशिवरास्थित शाळेच्या क्रीडागंणावर अनधिकृत बांधलेल्या मदरसाच्या बांधकामाबाबत मा.उच्च न्यायालयाने चौकशीचे आदेश माहे मे, २०२५ मध्ये दिले आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार चौकशी पूर्ण झाली असल्यास अनधिकृत बांधकाम तोडण्याची कारवाई करण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ०५ मे,२०२५ रोजीच्या जनहित याचिका क्र. ५१/२०२२ व रिट याचिका क्र. १८५३/२०१९ मधील अंतिम आदेशानुसार सहाय्यक आयुक्त के/पश्चिम यांनी दिनांक १९ जुलै,२०२५ रोजी शाळेच्या क्रीडांगणावर अनधिकृत बांधकामाबाबत अंतिम आदेश पारित केलेले आहेत व संबंधित संस्थेला अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यासाठी दिनांक २८ जुलै,२०२५ रोजी पर्यंत मुदत देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गावर प्रवेश करण्याकरीता व बाहेर पडण्याकरीता मेहकर (जि.बुलढाणा) येथे नवीन मार्ग तयार करणेबाबत

**(१०) ४४१९ (१८-०७-२०२५) श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गावर बुलढाणा व चिखली भागातून मेहकर नजिक प्रवेश करण्यासह बाहेर पडण्याकरिता दहा ते बारा किलोमिटरचा फेरा घ्यावा लागत असून मेहकर शहरातील रहदारीचा देखील अडथळा निर्माण होतो यासाठी नवीन पोच मार्ग तयार करणेबाबत तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.लोकप्रतिनिधी यांनी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात नवीन पोच मार्ग तयार करण्याच्या दृष्टीने रस्त्यांची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन अस्तित्वात असलेल्या रस्त्याचा दर्जा, लांबी,रुंदी तसेच दर्जोन्नतीसाठी आवश्यक असणाऱ्या निकषांप्रमाणे तालुका नकाशा, समजुतीचा नकाशा, परिशिष्ट-अ, आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्र इत्यादी आवश्यक ती कार्यवाही करुन सर्व कागदपत्रांसह अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालानुसार शासनाने नवीन मार्ग तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२२-०१-२०२६) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) होय. हे खरे आहे.

निवेदनाचे संदर्भात नवीन पोच मार्ग तयार करण्याच्या संदर्भातील अहवालावर कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) रस्त्याच्या दर्जोन्नती करीता शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०१४/प्र.क्र.६५/नियो-२, दिनांक २०/०७/२०१५ मध्ये नमूद निकषाच्या अधिन राहून उचित कार्यवाही करणेचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## नंदुरबार शहरातील स्थलांतरीत झालेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाच्या जागेबाबत

**(११) ४४५१ (१८-०७-२०२५) श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाचे पूर्ण क्षमतेने सुरु असलेले जुने कार्यालय हे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान सर्किट हाऊस, टोकरतलाव रोड, नंदुरबार येथील नुतन इमारतीमध्ये स्थलांतरीत झाले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्या कार्यालयाच्या इमारतींची जागा ही २ एकरांपेक्षा जास्त असून सदर शासकीय जागेवर अतिक्रमण होऊ नये म्हणून ती जागा पोलीस विभागाकडे वर्ग करण्यात यावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीकडून मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे लेखी निवेदन करण्यात आले असल्याची बाब

निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नंदुरबार शहरातील स्थलांतरीत झालेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाची जागा पोलीस विभागाकडे वर्ग करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०७-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रस्तुत प्रकरण शासन स्तरावर विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील अंधेरी पूर्व आणि पश्चिमेस जोडणाऱ्या पुलाचे काम अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(१२) ४४९७ (१८-०७-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील अंधेरी पूर्व आणि पश्चिमेला जोडणारा गोपाळ कृष्ण गोखले पूलाचे काम अद्यापही सदरील पुलाचे बांधकाम अपूर्ण असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील पुलाचे बांधकाम अपूर्ण असल्याने याभागात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली असून पुलांचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) अंधेरी पूर्व व पश्चिमेस जोडणाऱ्या गोपाळ कृष्ण गोखले पुलाचे मुख्य काम पूर्ण करण्यात आले आहे.तथापि, अनुषंगिक कामे जसे पूलाखालील स्लिप रोड, दुसऱ्या टप्प्यातील जिन्याचे काम नियोजित पध्दतीने ऑक्टोबर, २०२५ पर्यंत प्राधान्याने करण्याचे नियोजित आहे.

गोखले पुलाच्या सर्व मार्गिका (३+३ मार्गिका) तसेच सी.डी.बर्फिवाला पुलाच्या वाहतुकीकरीता दि ११/०५/२०२५ पासून खुला करण्यात आला. सद्य:स्थितीत गोखले पुलावर वाहतूक कोंडीची समस्या नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

## छत्रपती संभाजीनगर शहरातील ग्रीन झोन मध्ये झालेली बेकायदा बांधकामे गुंठेवारी अधिनियमांतर्गत नियमित करण्यात येणार असल्याबाबत

**(१३) २२०१६ (०४-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर शहरातील ग्रीन झोन मध्ये झालेली ७० ते ८० हजार बेकायदा बांधकामे गुंठेवारी अधिनियमांतर्गत नियमित करण्यात येणार असल्याची तसेच ग्रीन झोन मधील ही बांधकामे यलो झोन मध्ये आणण्याचा निर्णय प्रशासकांनी घेतला असून यासाठी गुंठेवारी कक्ष सुरू करून बेकायदा बांधकामे अधिकृत करण्यात येणार असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच चौकशीच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०१-२०२६) :** (१) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची वाढीव हद्द विकास योजना दिनांक १५/१०/१९९१ रोजी मंजूर झाली होती. सदर विकास योजनेमधील नाविकास क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत वसाहती झाल्या होत्या, ज्यांच्या नियमितीकरणाची नागरिकांकडून मागणी होती; परंतु महानगरपालिकेमार्फत अशा सर्व प्रकरणांमध्ये कोणतेही नियमितीकरण करण्यात आले नव्हते.

तद्नंतर, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमाच्या कलम २६ अन्वये, दिनांक ०६/०३/२०२४ रोजी सुधारीत प्रारुप विकास योजना प्रसिध्द करण्यात आली व सदर विकास योजनेन्वये, जे क्षेत्र नाविकास विभागातून रहिवासी विभागात प्रस्तावित करण्यात आले अशा भागातील गुंठेवारी नियमितीकरणास महानगरपालिकेने दिनांक १५/०३/२०२४ रोजीच्या ठरावान्वये मंजुरी देण्यात आली होती, त्यानुसार काही प्रकरणे नियमितही करण्यात आली. दरम्यान, सदर सुधारीत विकास योजना दिनांक १५/०४/२०२५ रोजी भागश: मंजूर झाली असून दिनांक २७/०७/२०२५ पासून अंमलात आल्यामुळे सध्या नाविकास क्षेत्रात गुंठेवारी नियमितीकरणाची प्रक्रिया करण्यात येत नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील बेरोजगारी कमी करण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(१४) २३३५१ (२०-०७-२०२४) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारताचे आर्थिक सल्लागार यांच्या हस्ते माहे मार्च, २०२४ मध्ये प्रसिध्द झालेल्या "भारतीय रोजगार अहवाल २०२४" (इंडिया एम्प्लॉयमेंट रिपोर्ट २०२४) नुसार देशात बेरोजगारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच असून महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात ६५% इतकी बेरोजगारांची संख्या असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १५ ते २९ वयोगटातील युवकांमध्ये बेरोजगाराचे प्रमाण वाढत असून रोजगार हमी कायदा अस्तित्वात असताना देखील त्यांना नियमित रोजगार मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत मोठ्या प्रमाणावर औद्योगिक विकास होत असून त्यासाठी लागणारे कुशल मनुष्यबळ पुरेशा प्रमाणात निर्माण होत नसल्याने अनेक पदवीधर देखील बेरोजगार होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात बेरोजगारी निर्मूलन करण्यासाठी "आंतरराष्ट्रीय श्रम संघटना" आणि "इन्स्टिट्यूट ऑफ ह्युमन डेव्हलपमेंट" यांनी केंद्र व राज्यांना केलेल्या शिफारशींबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१२-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.
Periodic Labor Force Survey, २०२४ नुसार महाराष्ट्रातील बेरोजगारीचा दर सन २०१७-१८ मधील ४.८ टक्के वरुन सन २०२३-२४ मध्ये ३.३ टक्के इतका कमी झाला आहे.
(२) हे खरे नाही.
राज्यात केंद्र पुरस्कृत महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी सुरळीतपणे सुरु आहे.
(३) हे खरे नाही.
राज्यातील औद्योगिक गरजांनुसार कुशल मनुष्यबळ निर्माण व्हावे याकरीता राज्यातील उमेदवारांना विविध क्षेत्रातील अभ्यासक्रमांचे सूचीबध्द प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून अल्पमुदतीचे प्रशिक्षण देऊन रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच, सोसायटीमार्फत प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आणि प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान (प्रमोद महाजन- ग्रामीण कौशल्य केंद्र व आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र) या राज्य शासन पुरस्कृत योजना व किमान कौशल्य विकास केंद्र ही जिल्हा पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला शहराच्या विकास आराखड्यात अनियमितता झाल्याबाबत

**(१५) २४१५० (१६-०७-२०२४) श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला शहराच्या मूळ हद्द विकास योजना एम आर टी पी १९६६ चे कलम २६ अंतर्गत अकोला महानगर पालिका प्रशासनाने विकास आराखड्याचे काम खाजगी कंपनीला देतांना प्रचलित निविदा प्रक्रियेचे नियमानुसार पालन करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महानगरपालिका क्षेत्राचा हद्दवाढीनंतरचा सुधारित विकास योजना आराखडा (डीपी प्लॅन)दिनांक १९ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास प्रसिध्द केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अकोला महानगरपालिकेच्या नगर रचना विभागाची अपुरी यंत्रणा लक्षात घेता शासनाने महापालिकेत नव्याने नगररचना, विकास योजना कार्यालयाचे गठन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विकास योजनेमध्ये असलेले आरक्षण संपादनाबाबतची माहिती महानगर पालिकेने सादर केली नसून नगर रचना विभागाच्या निकषानुसार शहराचे योग्यरित्या नियोजन करण्यासाठी "डीपी प्लॅन" तयार केल्यानंतर दर वीस वर्षानंतर सुधारित डीपी प्लॅन तयार करणे क्रमप्राप्त असून विकास आराखड्याचे प्रसिद्धीकरण करतांना प्रचलित कायद्याच्या तरतुदीचे पालन करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विकास योजना प्रसिद्धी पूर्वी उक्त महानगरपालिकेशी सबंधित स्थानिक लोकप्रतिनिधींशी चर्चा केली नसून प्रसिद्धी नंतर सदर विषयावर स्थानिक लोकप्रतिनिधिनी मुदतीत हरकती नोंदविल्यानंतर सदर आराखड्यात अनियमितता व गैरप्रकार झाल्याची बाब दिनांक २४ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निदर्शनास आलेल्या त्रुटींचे निराकरण करुन विकास आराखडा तयार करण्याबाबत तसेच संबंधित प्रकरणी आढळून आलेल्या दोषींवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-०३-२०२६) :** (१) व (२) प्रचलित प्रक्रियेचे पालन करुन, अकोला महानगरपालिका कार्यालयाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक-अ अमरावती विभागीय पुरवणी, जानेवारी २५-३१, २०२४ मध्ये दिनांक १९/०१/२०२४ रोजी अकोला शहराच्या मूळ हद्दीची दुसरी सुधारीत + प्रथम वाढीव हद्दीची सुधारीत + दुसरी वाढीव हद्दीची प्रारुप विकास योजना प्रसिध्द केली आहे.
(३) महानगरपालिका कार्यालयाने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.विघयो-३७१९/प्र.क्र.४१/नवि-२७, दिनांक ०५/०८/२०१९ अन्वये प्रारुप विकास योजना तयार करण्याकरीता उपसंचालक, नगर रचना, विशेष घटक, अकोला महानगरपालिका, अकोला स्थापन करण्यात आले आहे.
(४) महानगरपालिका कार्यालयाचे पत्र क्र.८१०/२०२२, दिनांक १९/१०/२०२२ अन्वये आरक्षणांबाबत व इतर माहिती पुरविण्यात आली असून प्रचलित कायद्यातील तरतुदींचे सुयोग्य पालन झालेले आहे.
(५) मा.विधानपरिषद सदस्य यांच्या दिनांक २४/०१/२०२४ रोजीच्या निवेदनाबाबत व दिनांक १४/०२/२०२४ रोजी उपस्थित मुद्यांबाबत महानगरपालिका कार्यालयाने अनुक्रमे दिनांक १२/०७/२०२४ व दिनांक ०१/०३/२०२४ रोजीच्या पत्रांन्वये सविस्तर अहवाल सादर करण्यात आलेला असून कोणतीही अनियमितता झालेली नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील चांदिवली येथील दुर्गादेवी शर्मा मनपा मराठी शाळेच्या दुरवस्थेबाबत

**(१६) २४२३९ (१७-०६-२०२४) श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदिवली (मुंबई) येथील दुर्गादेवी शर्मा महानगरपालिका मराठी शाळेची पालिकेच्या दुर्लक्षामुळे दुरवस्था झाली असून बालवाडी ते आठवीपर्यंत सुमारे ३०० विद्यार्थी येथे शिक्षण घेत असलेल्या या शाळेतील दोन वर्गातील विद्यार्थी एकाच वर्गात बाकावर तर उर्वरित वर्गातील विद्यार्थी जमिनीवर बसून शिक्षण घेत असल्याची बाब, दिनांक १४ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील सर्वसामान्य कुटुंबांतील विद्यार्थ्यांचे शिक्षण दर्जेदार व्हावे, यासाठी महापालिकेने सीबीएससी, केंब्रीज शाळा सुरु केल्या, परंतु चांदिवलीतील दुगदिवी शर्मा मराठी शाळा पालिकेच्या

हलगर्जीपणामुळे दुर्लक्षित राहिली असून सन १९८५ पासून या शाळेचे नुतनीकरण वा पुनर्विकास झालेला नाही तसेच पुरेसा शिक्षक वर्ग सुध्दा नियुक्त केला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीत शाळेची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, सदर शाळेचा पुनर्विकास करण्याबाबत व पुरेसा शिक्षक वर्ग नियुक्त करुन विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रशासनाकडून शालेय इमारत, तसेच शिक्षकवर्ग याबाबत सातत्याने शाळेला भेटी देऊन त्याबाबत आढावा घेतला आहे.
(४) शाळेची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाली असून लवकरच शाळेच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## घाटकोपर (मुंबई) येथे पेट्रोल पंपावरील बेकायदेशीर होर्डिंग कोसळून अनेक लोक मृत्यूमुखी पडल्याबाबत

**(१७) २४२९० (१७-०६-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घाटकोपर (मुंबई) येथे दिनांक १३ मे २०२४ रोजी अचानक उद्भवलेल्या वादळी पावसामुळे पेट्रोल पंपावरील बेकायदेशीर १२० फूट x १२० फूट आकाराचे २५० टन वजनाचे होर्डिंग पेट्रोल पंपावर कोसळून १६ लोकांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,लोहमार्ग रेल्वे पोलीस विभागाच्या अखत्यारीत होर्डिंग उभे करण्यात आलेली जमीन राज्य शासनाने पोलीस हाऊसिंगला दिली होती व पोलीस हौसिंगने रेल्वे पोलिसांना दिल्यामुळे मुंबई महानगरपालिका आणि रेल्वे यांच्यामध्ये याबाबत वाद असून महानगरपालिका नियमावली नुसार होर्डिंगचा आकार ४० बाय ४० फूट असणे अनिवार्य असताना लोहमार्ग रेल्वे पोलीस विभागाच्या अखत्यारित असलेले हे होर्डिंग १२० बाय १२० फुटांपेक्षा जास्त आकाराचे असल्याचे निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घटनेनंतर रेल्वे हद्दीतील सर्व होर्डिंगचे सर्व्हेक्षण करण्यात आले असून त्यात ९९ ठिकाणचे होर्डिंग मोठ्या आकाराचे (ओव्हर साईज) असल्याचे तसेच पुणे शहरातही रेल्वेच्या हद्दीत मोठमोठे होर्डिंग असल्याचे निदर्शनास आले असून रेल्वेच्या अखत्यारीत असलेल्या होर्डिंगना महानगरपालिकेची नियमावली लागू होते किंवा कसे याबाबत स्पष्टता आहे काय, तसेच रेल्वे विभागामध्ये या घटनेची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, सदरील घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत कायआढळूनआले त्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली अथवा करण्यात येत आहे, तसेच अशा घटनांची

पुनरावृत्ती होऊ नये याकरीता राज्यातील सर्व होर्डिंगचे संरचनात्मक लेखापरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

मुंबईत दिनांक १३ मे, २०२४ रोजी वादळी वाऱ्यामुळे घाटकोपर येथे मोठा जाहिरात फलक पेट्रोल पंपावर कोसळून झालेल्या दुर्घटनेत सुमारे १७ व्यक्ती मृत व ८१ व्यक्ती जखमी झाले.
(२) व (३) होय, हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एन विभागाच्या हद्दीतील रेल्वे होर्डिग्जचे सर्व्हेक्षण करण्यात आलेले आहे. एन विभागाच्या हद्दीतील रेल्वेपरिसरात चार होर्डीग्ज व १६ जाहिरात फलक आढळून आले. याबाबत रेल्वे प्राधीकरणाला कळविण्यात आलेले आहे. जाहिरात फलकांबाबत महानगरपालिकेच्या जाहिरात धोरणांचे अटी व शर्तीचे रेल्वे प्राधिकरणाकडून पालन केले जात नाही. तसेच याबाबत महानगरपालिकेने रेल्वे प्राधिकरणाविरुध्द सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे.
(४) सदर घटनेच्या चौकशीसाठी गृह विभागाकडून चौकशी समिती नेमण्यात आली होती. अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता कार्यवाही करण्याच्या सूचना दिनांक १४ मे,२०२४ व दिनांक ०६ जून,२०२४ रोजी सर्व महानगरपालिका आयुक्त व सर्व मुख्यधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## टाटा मेमोरियल हॉस्पिटल येथे कर्करोगावरील उपचार घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना राहण्याची सोय करण्याबाबत

**(१८) २४२९६ (१७-०६-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परळ येथील टाटा मेमोरियल हॉस्पिटल तसेच केईएम रुग्णालय, (मुंबई) येथे कर्करोगावरील उपचार घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना राहण्याची सोय करण्याची मागणी विविध संघटनांनी तसेच नागरिकांनी वेळोवेळी शासनाकडे केली असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास बहुतांश रुग्णांची आर्थिक स्थिती चांगली नसल्यामुळे रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांसाठी गृहनिर्माण विभागाने म्हाडा इमारतीतील सदनिका तात्पुरत्या स्वरूपात यापूर्वी उपलब्ध करून दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण भागातून मुंबईत येणाऱ्या रुग्णांचे प्रमाण अधिक असून इतर जिल्ह्यातूनही अनेक रुग्ण येत असतल्याने अनेक वेळा मुंबईत कोणी नातेवाईक-ओळखीचे लोक नसल्याने रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांना राहण्याची समस्या निर्माण होत असल्यामुळे या धर्मशाळेत रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांची राहण्याची, जेवणाची सोय करण्यात येते काय,
(४) असल्यास या रुग्णालयाच्या परिसरातील पथरस्त्यावरच रुग्णांचे नातेवाईक बसत असून शासनाने पुढाकार घेऊन या रुग्णालयासह विविध रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या निर्धन रुग्णांसाठी व त्यांच्या

नातेवाईकांसाठी राहण्याची सोय श्री.गाडगे महाराज मिशन धर्मशाळा ट्रस्ट यासारख्या अन्य विविध सामाजिक संस्थांच्या मदतीने करावी अशी मागणी सुद्धा वेळोवेळी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, टाटा मेमोरियल हॉस्पिटल येथे कर्करोगावरील उपचार घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना राहण्याची सोय करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०१-२०२६) :** (१)(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रा.ए.स्मा. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयाच्या अखत्यारीत ‘सावली’ आणि ‘विसावा’ या दोन सामजिक संस्थाद्वारे रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांना राहण्याची सोय केली जाते. रुग्णालयाच्या आवाराबाहेर इतर संस्थांमार्फतही रुग्णांच्या नातेवाईकांसाठी जेवणाची सोय केली जाते.

रुग्णालयात रुग्ण भरती असताना व बाहेरगावाहून आलेल्या रुग्णाच्या नातेवाईकांना “अक्षय चैतन्य” या सामाजिक संस्थेमार्फत नाश्ता, दुपारचे भोजन व रात्रीचे भोजनही दिले जाते.
(४) व (५) रा.ए.स्मा. रुग्णालय, परळ मुंबई येथे कर्करोगावरील उपचार घेणाऱ्या रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांना राहण्याची सोय करण्यासाठी रा.ए.स्मा. रुग्णालयाचे समाज विकास अधिकारी मदत करतात. बहुतांश रुग्णांची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने, त्यांना श्री.संत गाडगे महाराज धर्मशाळा, परळ अपना घर, चेंबुर नाना पालकर स्मृती समिति, परळ करो होम, सायन बुधराणी ट्रस्ट / सेंट ज्युड, शिवडी (डॉक्टरांमार्फत करण्यात येते)

---

## मौजे मोघर पाडा (जि.ठाणे) येथील भूखंड सार्वजनिक वाहतूक प्रकल्पांतर्गत विकसित करण्याबाबत

**(१९) २४३९१ (१०-०१-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मोघर पाडा (जि.ठाणे) येथील सर्व्हे क्रमांक ३० मधील १७४ हेक्टर जागा सार्वजनिक वाहतूक प्रकल्पांतर्गत मेट्रो कारशेड डेपो व कोस्टल रोडकरीता व इतर प्रयोजनासाठी माहे ऑक्टोबर, २०२३ दरम्यान अधिग्रहण केली असून येथील पात्र पट्टेधारक शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी सिडकोच्या प्रचलित धोरणानुसार त्याच ठिकाणी २२.२० टक्के विकसित भूखंड देण्याचे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मेट्रो कार शेड डेपो व कोस्टल रोडसाठी लागणाऱ्या जागेसाठी मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मोजणी नकाशे, अधिग्रहण प्रस्ताव इत्यादी बाबींची पूर्तता करण्याच्या दृष्टीने केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, जिल्हाधिकारी, ठाणे यांनी पात्र पट्टेधारक शेतकरी व पात्र अतिक्रमणधारकांची अंतिम यादी एमएमआरडीएला कळविली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नियोजित (२२.५०टक्के) विकसित भूखंड हा वर्ग एक मध्ये परिवर्तित होऊन शेतकऱ्यांना सदर भूखंड विकसित करण्याचा अधिकार देण्याबाबत कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे मोघरपाडा येथील सर्वे नं. ३०मधील १७४.०० हेक्टर शासकीय जमिनीची मोजणी उपअधीक्षक भूमिअभिलेख ठाणे यांच्याकडून दिनांक २७/०१/२०२२ व दि ३१/०१/२०२२ रोजी पूर्ण करण्यात आली. सदरहू शासकीय जमीन मुंबई मेट्रो मार्गिका क्र. ४, ४अ व १० करीता मेट्रो कारशेड उभारणी व उर्वरित जमीन विकसित करण्याकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास शासनाच्या दिनांक १६/१०/२०२३ या शासन निर्णयाद्वारे विनामोबदला हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.

मौजे मोघपाडा येथील सदर जमीन जिल्हाधिकारी, ठाणे यांनी काही शेतकऱ्यांना भाडेपट्टयावर शेती करण्याकरीता वितरीत करण्यात आली होती. सदर भाडेपट्टे धारक प्रकल्प बाधित शेतकऱ्यांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने २२.५%, व १२.५% विकसित भूखंड वाटप करण्याच्या योजनेस दिनांक १२/१२/२०२३ रोजी झालेल्या १५५व्या बैठकीमध्ये मान्यता प्रदान केलेली आहे.

जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडून एकूण १७४.०१ हेक्टर आर एवढे क्षेत्र अटी व शर्तीवर हस्तांतरीत करण्याचे आदेश निर्गमीत करण्यात आले असून, सदर क्षेत्राचा ताबा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे दिनांक १३/०६/२०२५ रोजी देण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी प्रकल्प बाधित शेतकऱ्यांना प्राधिकरणाने विकसित भूखंड देण्याबाबत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यकती प्रशासकीय कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

## भिवंडी-निजामपूर शहर (ता.भिवंडी, जि ठाणे) महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना वरिष्ठ लिपिक पदावर पदोन्नतीच्या निकषाबाबत

**(२०) २४४०० (१०-०१-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी- निजामपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना वरिष्ठ लिपिक पदावर पदोन्नती देण्याकरीता पदवीधर ही शैक्षणिक पात्रता कमी करुन इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी उत्तीर्ण कर्मचारी यांना पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव नगरविकास विभागास सादर करण्यात आल्याचे माहे जुलै, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) होय, सदर प्रस्तावाबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.